संपूर्ण महाराष्ट्रात प्रसार पावलेले
सातारी बाण्याचे प्रमुख साप्ताहिक

३२

dhansantosh123@gmail.com
मोबा. 9822107981

RNI NO.-54719/84

# धनसंतोष

■ संस्थापक | श्री. भाऊसाहेब नलावडे ■ संपादक | सौ. विमल नलावडे ■ PRN No. - STR/009/2015-2017

वर्ष ३२ वे | अंक १७ वा | सोमवार दि. १४|०९|२०१५ | २ रुपये

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव



यशस्वी खेळाडूंसमवेत प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत, प्रा. बाळासाहेब भोसले, प्रा. अरुण पाटील, किशोर अनभुले आदी.

## डी. पी. भोसले कॉलेजचे जलतरण स्पर्धेत यश

कोरेगाव - शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सातारा विभागीय जलतरण स्पर्धेत येथील डी.पी. भोसले कॉलेजने उज्वल यश संपादन केले.

४ = १०० मी. फ्रीस्टाईल रिले स्पर्धेत डी.पी. च्या संघाने प्रथम क्रमांक पटकावला तर ५० मी. बटरफ्लाय, २०० मी. बटरफ्लाय, १०० मी. बटरफ्लाय व फ्रीस्टाईल, २०० मी. बेस्ट स्ट्रोक यामध्ये डी.पी. भोसले कॉलेजच्या स्वप्नील कदम, सुहास फडतरे, अशुतोष भोसले, रणजित भोसले, अक्षय देशमुख, संदिप यादव, गणेश भोसले, अश्विन येवले या खेळाडुंनी यश मिळविले. या सर्व स्पर्धकांची अंतर विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. यशस्वी खेळाडूंचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी अभिनंदन केले आहे. या खेळाडूंना जिमखाना विभाग प्रमुख प्रा. बाळासाहेब भोसले, प्रा. अरुण पाटील व किशोर अनभुले यांनी मार्गदर्शन केले.